**ठळक बातम्या**

- एकोणऐंशिव्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या तयारीचा देशभर उत्साह, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती आज संध्याकाळी देशाला संबोधित करणार

- स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरातल्या पोलीस, अग्निशमन कर्मचारी होमगार्डचा गौरव, राज्यातल्या ४९ पोलीस कर्मचाऱ्यांना शौर्य पुरस्कार

- बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या ५५६ सदनिकांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

- मुंबई किनारी रस्ता उद्यापासून २४ तास खुला राहणार अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**आणि**

- भटक्या कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्ये हलवण्याच्या निर्देशाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवरचा निकाल सर्वोच्च न्यायालयानं राखून ठेवला

**<><><><>**

देश एकोणऐंशिवा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी सज्ज होत आहे. नागरिकांच्या उत्साहाला उधाण आलं असून नव्या आकांक्षा, नवी स्वप्नं आणि नव्या आशा यांचा जागर उद्या साजऱ्या होणाऱ्या या राष्ट्रीय सणाच्या निमित्तानं केला जात आहे. दिल्लीसह देशभरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. लाल किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमात सन्माननीय अतिथी म्हणून या वर्षी २१० सरपंचांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यामध्ये महिला सरपंचांचा लक्षणीय सहभाग आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १५ सरपंचांचा समावेश असून यात नऊ महिला सरपंच आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासीयांना संबोधित करणार आहेत. हे संबोधन संध्याकाळी सात वाजल्यापासून आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून प्रसारित केलं जाईल. त्यानंतर या संबोधनाचं इंग्रजी भाषांतर प्रसारित होईल. या संबोधनाचा स्थानिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता

प्रसारित होणार आहे. यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरचं संध्याकाळी सात वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज संध्याकाळी पावणेसात वाजता प्रसारित होईल.

**<><><>**

एकोणऐंशिव्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी दिल्लीत लाल किल्ल्यावर ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर ते राष्ट्राला संबोधित करतील. यावर्षीच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याची संकल्पना 'नवा भारत' अशी आहे.

अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून….vc

*लाल किल्ल्यावरचं सादरीकरण पाहण्यासाठी विविध क्षेत्रातल्या सुमारे ५ हजार खास पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. पहिल्यांदाच स्वातंत्र्य दिनाच्या संध्याकाळी देशभरात १४०हून अधिक प्रमुख स्थळांवर भूदल, नौदल, हवाई दल, भारतीय तटरक्षक दल, राष्ट्रीय सुरक्षा दल, आसाम रायफल्सच्या बँडद्वारे प्रदर्शने आयोजित करण्यात येणार आहेत.*

*स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर १ हजार ९० पोलीस, अग्निशमन कर्मचारी, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारात्मक सेवेतल्या कर्मचाऱ्यांना सेवा आणि शौर्य पदकं जाहीर झाली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातल्या पोलीस सेवेतल्या ४९, अग्निशमन सेवेतल्या ८, होमगार्ड ५, तर सुधारात्मक सेवेतल्या ८ कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. पोलीस सेवेतल्या अनिल कुंभारे, प्रमोदकुमार शेवाळे, बाळासाहेब भालचीम, संजय चांदखेडे, नेताजी बंडगर, मनोहर महाका यांना शौर्य पुरस्कार देण्यात येणार आहे. सुरेश तेलामी यांना मरणोत्तर शौर्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.*

*स्वातंत्र्य दिनाच्या निमित्तानं सीमा सुरक्षा दलही १६ जवानांना अत्युत्तम वीरतेसाठी शौर्य पदकं प्रदान करणार आहे.*

**<><><>**

भारताच्या एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने होणारा राज्यातला मुख्य शासकीय सोहळा उद्या मुंबई इथं मंत्रालयात होणार आहे. सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. पुणे इथं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. ठाणे इथं जिल्हा मुख्यालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तर बीड इथं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. नाशिक इथं राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

यांच्या हस्ते तर रायगड जिल्ह्यात राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

**<><><><>**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्तानं आज राज्यभरात विविध जिल्ह्यांमध्ये तिरंगा यात्रा निघत आहेत. बीड शहरात आज तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत राजकीय पक्षाचे पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक सहभागी झाले होते. जालना जिल्ह्यात सर्वांनी हर घर तिरंगा अभियान साजरं करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे. धुळे शहरातून १ हजार १११ फूट लांब तिरंगा ध्वजासह पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत विद्यार्थी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामान्य नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. पालघर जिल्ह्यात आज जय श्री राम पालघर नगर सेवा समितीतर्फे बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. धाराशिव शहरात जिल्हा प्रशासन आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानं सायकल रॅली काढण्यात आली. स्वातंत्र्य दिनानिमित्त परभणी शहरापासून जवळ असलेल्या ओंकारेश्वर विद्यालयाच्या वतीनं आज तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत शाळेतले विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><>**

देशभरात आज विभाजन विभिषिका दिवस पाळला जात आहे. स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर देशाची झालेली फाळणी आणि त्यावेळेस झालेल्या भीषण संहाराच्या स्मृतिप्रित्यर्थ हा दिवस पाळला जात आहे. या अनुषंगानं देशभरात आज फाळणीच्या आठवणी दाखवणाऱ्या छायाचित्र प्रदर्शनांसह विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त समाज माध्यमावरच्या संदेशात, फाळणीच्या काळात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या लाखो निरपराध नागरिकांना, शूरवीरांना आणि बेघर झालेल्या असंख्य कुटुंबांना आदरांजली अर्पण केली.

**<><><><>**

पुनर्विकास करण्यासाठी विकासकाची गरज नाही, तर म्हाडासारखी यंत्रणा उत्तम पद्धतीने पुनर्विकास करू शकते, हे बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाने सिद्ध केलं, असं

प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या ५५६ सदनिकांचं वितरण त्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. बीडीडी चाळ म्हणजे मुंबईच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा जिवंत इतिहास आहे, तिच्या पुनर्विकासाची वर्षानुवर्षं प्रलंबित असलेली मागणी या सरकारने पूर्ण केली, असं ते म्हणाले. या धर्तीवर धारावी पुनर्विकास प्रकल्पही यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मउपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, मंगलप्रभात लोढा, नीलम गोऱ्हे, पंकज भोयर, खासदार मिलिंद देवरा, संबंधित विभागांचे अधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

मुंबईचा किनारी रस्ता उद्यापासून २४ तास वाहतुकीसाठी खुला असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मुंबई किनारी रस्त्यावरचं विहार क्षेत्र आणि चार पादचारी भुयारी मार्गाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. वाहतुकीच्या नियमांचं पालन करून या रस्त्याचा वापर करावा, असं आवाहन त्यांनी केलं. आज लोकार्पण केलेले प्रकल्प हे फक्त काँक्रीट, स्टील आणि तंत्रज्ञानाची कमाल नसून मुंबईच्या भविष्याची गती, गुणवत्ता आणि सुरक्षिततेची हमी आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. यामुळे मुंबईचं वाहतुकीचं जाळं आणखी सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबईत सध्या सुरू असलेले प्रकल्प गेमचेंजर असून यामुळे मुंबईच्या रस्त्यांवरची वाहतूक कोंडी बऱ्याच प्रमाणात कमी होईल आणि मुंबईकरांचा प्रवास सुखकर, तसंच पर्यावरणपूरक होईल, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या सगळ्या भटक्या कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्ये हलवण्याच्या निर्देशाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयानं आज निकाल राखून ठेवला.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या पीठानं या विषयाची स्वतःहून दखल घेऊन दिलेल्या निर्देशांवर न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती

संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजरिया यांच्या पीठानं सुनावणी घेतली. या कुत्र्यांना हलवण्याचे निर्देश यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या इतर पीठांनी तत्सम प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्देशांशी विसंगत असल्याचा मुद्दा काल काही वकिलांनी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यासमोर उपस्थित केला होता. त्यानंतर हे प्रकरण तीन नव्या न्यायाधिशांच्या पीठाकडे देण्यात आलं.

**<><><><>**

मुंबईतल्या कबुतरखाना बंदीचा  निर्णय उच्च न्यायालयाचा असून तो सर्वांनी पाळला पाहिजे, असं मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटलं आहे. त्यामुळे कोणीही कबुतरांना खायला घालू नये, असंही ते म्हणाले. स्वातंत्र्यदिनी मांसविक्री बंदीचा निर्णय हा लोकांचा स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रकार आहे, असंही त्यांनी सांगितलं. पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांची पुर्नतपासणी करण्यात यावी असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><>**

राजकीय व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वोट चोरी या शब्दावर केंद्रीय निवडणूक आयोगानं आक्षेप घेतला आहे. अशा प्रकारचे शब्द भारतीय मतदारांच्या प्रतिष्ठेवर आणि आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या प्रामाणिकपणावर आघात केल्यासारखे असल्याचं त्यांंनी म्हटलं आहे. एक व्यक्ती एक मत हे तत्त्व पहिल्या निवडणुकीपासून लागू असून बोगस मतदानाच्या तक्रारी पुराव्यानिशी सादर केल्या पाहिजेत. एका व्यक्तीने दोनदा मतदान केल्याचा पुरावा असल्यास तो आयोगाकडे सादर करावा असंही आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><>**

खाद्यतेलाच्या टँकरमधून गुजरातला पाठवण्यात येणारी विदेशी दारू धुळे पोलिसांच्या पथकानं पकडली. यात एकूण ५५ लाख ९६ हजार २०० रुपये किंमतीची विदेशी दारु आणि ४५ लाख रुपये किंमतीचा टँकर असा एक कोटी ९६ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**//<><><><>//**